!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# अमरनाथ यात्रा सुरक्षित व सुरळीत करा

**शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची लोकसभेत केंद्रीय गृहमंत्रालयाकडे आग्रही मागणी**

**नवी दिल्ली ता २०** –कश्मीरमध्ये सुरु असलेल्या हिंसाचारामुळे अमरनाथ यात्रा तिसऱ्यांदा थांबवावी लागली. दरवर्षी अमरनाथ यात्रे दरम्यान हिंसाचार होतो आणि यात्रेत बाधा आणली जात आहे. यंदा यात्रेकरुंवरही पथराव करण्यात आल्याचे लोकसभेच्या निदर्शनास आणून देत गृहमंत्रालयाने अमरनाथ यात्रा सुरळीत व सुरक्षित पार पाडण्यासाठी सुरक्षेच्या कडक उपाय योजना करण्याची मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत केली. व यात्रेत हिंसाचारामुळे हजारो यात्रेकरुना एकाच स्थळी थांबवले जाते. तेथे यात्रेकरुंना सुविधांचा अभाव असुन, जीवनावश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करुन देण्याची मागणीही खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेत शुन्य प्रहारात केली.

जम्मु कश्मीरमध्ये लष्कराच्या मदतीने शिवरात्री ते श्रावण पोर्णिमा दरम्यान पवित्र अमरनाथ यात्रा आयोजित केल्या जाते. परंतू खोऱ्यातील हिंसाचारामुळे ६० पेक्षा कमी दिवस होणाऱ्या यात्रेत विघ्न आणले जातात. यात्रा वेळोवेळी थांबविल्या जाते. यंदा दोन जुलैला सुरु झालेली अमरनाथ यात्रा १५ दिवसांत तीन वेळेस थांबविण्यात आली. या यात्रेला श्रध्दाळू मोठ्या भक्ती भावाने नोंदणी करुन यात्रेला प्रस्थान करतात. परंतू यात्रा स्थगित झाल्याने त्यांचे नियोजन कोलमडते शिवाय एकाच जागी ताटकळल्याने मोठ्या समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे गृहमंत्रालयाने या यात्रेच्या नियोजनात विशेष लक्ष घालून यात्रा सुरळीत व सुरक्षित होईल याची काळजी घ्यावी अशी आग्रही मागणी शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी लोकसभेच्या शुन्य प्रहारात केंद्रीय गृहमंत्रालयाकडे केली.

**प्रसिध्दी प्रमुख**

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yogeshpayghan4329@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400